जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४४९ दिनांक - २२/१०/२०२४**

युनिट ६ गुन्हे शाखा पुणे शहर

## दुहेरी हत्याकांडांतील अडीच वर्षांपासुन फरार असलेला आरोपी केले जेरबंद

आगामी विधानसभा निवडणुकीचे अनुशंगाने गुन्हे प्रतिबंधक कारवाया तसेच पाहिजे व फरारी आरोपींचा शोध घेणेबाबत वरीष्ठांचे आदेशाप्रमाणे आज दिनांक २२/१०/२०२४ रोजी गुन्हे शाखा युनिट ६ कडील अधिकारी व अंमलदार हे युनिट हद्दीत गुन्हे प्रतिबंधक गस्त करत असताना पोलीस उप-निरीक्षक दळवी, पोलीस अमंलदार ताकवणे,व्यवहारे,पवार यांनी मिळालेल्या गोपनीय बातमीवरून लोणीकंद पोलीस स्टेशन गुन्हा रजी नंबर २०/२०२२ कलम ३०२,३०७,३४१,१४३,१४७, १४८,१४९,४२७ भारतीय दंड विधान सह आर्म ॲक्ट कलम ३(२५),४(२५) सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट ३,७ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५,३७(१) (३) सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रन अधिनियम कलम ३(१)(i)(३)(२) या गुन्हयातील अडीच वर्षांपासुन फरार असलेला आरोपी नामे **ऋग्वेद जालिंदर वाळके वय २३ वर्षे,** यास पेरणे टोलनाका शेजारी सागर हॉटेल जवळ, पेरणे, ता.हवेली, जि.पुणे येथुन सापळा रचुन ताब्यात घेतले आहे. सदर आरोपी विरूद्ध यापुर्वी खून,गंभीर दुखापत,बेकायदेशीर शस्त्र बाळगणे इत्यादी गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.शैलेश बलकवडे मा.पोलीस उपआयुक्त गुन्हे श्री.निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे २ श्री.राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली युनिट ६ गुन्हे शाखा,चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.वाहिद पठाण, सहा.पोलीस निरीक्षक मदन कांबळे, उप-निरीक्षक दळवी, पोलीस अमंलदार सकटे,मेमाणे,मुंढे,कारखेले,ताकवणे,व्यवहारे,पवार, काटे,धाडगे,तनपुरे, महीला पोलीस अंमलदार पानसरे,मांदळे यांनी केली आहे.


स्त्री
पुणे पोलीस
Pune Police